महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर ४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./परीक्षा /3084
दिनांक :-04/02/२०१९

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर

विषय:-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च२०१९ तोंडी परीक्षेचे साहित्य वितरणाबाबतच्या सुचना.
संदर्भ:- राज्यमंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा -६/ दिनांक २६/११/२०१८ चे पत्र.

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(इ.१०वी) परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०१९ ला प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रात्यक्षिक, तंत्र व पुर्व व्यावसासिक , नवीन,पूर्व व्यावसायिक,शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र, विषयाची प्रात्यक्षिक्र परीक्षा व तोंडी परीक्षा सोमवार दिनांक ११/०२/२०१९ ते गुरूवार दिनांक २८/०२/२०१९ या कालीवधीत,तसेच आऊट ऑफ टर्न परीक्षा शनिवार दिनांक २३/०३/२०१९ व सोमवार दिनांक २५/०३/२०१९ या दोन दिवसांच्या कालावधीत आयोजीत करण्याबाबत संदंर्भीय परिपत्रकाद्वारे कोल्हापूर विभागीय मंडळाच्या www.sscboardkolhapur.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. **प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षेचे साहित्य दिनांक ०९ /० २ /२०१९ रोजी संबंधित वितरण केंद्रावर सकाळी १० ते ५.०० या वेळेत वाटप करण्यात येणार आहे याची सर्व शाळा प्रमुखांनी नोंद घ्यावी.**

**गुणतक्ते भरण्याबाबतच्या व मंडळास सादर करण्याबाबतच्या सुचना**

मार्च २०१९ या प्रात्यक्षिक /अंतर्गत/तोंडी ((Practical / Internal / Oral ) परीक्षेसाठी या पध्दतीचे गुणतक्ते देण्यात येत आहेत. त्या अनुषगांने गुणतक्ते भरताना Scanning योग्यरितीने होण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे

१) प्राप्त गुण बैठक क्रमांक( seat no ) समोर दिलेल्या चौकटीतच सुवाच्च अक्षरात भरावे व त्या अनुषंगाने समोरील OMR चे वर्तुळ काळ्या/निळ्या ( Blue / Black ) शाईने भरावे.
२) बारकोडवर काहीही लिहू नये.सही करू नये.
३) सदर OMR शीटला फोल्ड/स्टेपल करू नये.
४) गुणपत्रिका ( Marklist ) भरताना OMR चे वर्तुळ भरलेले आहे व खाली Page Total केलेली आहे याची खातरजमा करून घेण्यात यावी.
५) सदर देण्यात येणाऱ्या OMR पध्दतीच्या गुणपत्रिकेमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये.
६) गुणपत्रिकेमध्ये असलेल्या छापील बैठक क्रमांकाची एकूणातील गुणात नोंद घ्यावी.गुणपत्रिकेमध्ये अतिरिक्त बैठक क्रमांक अथवा विषय बदल घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या बैठक क्रमांकाची नोंद करून स्वतंत्ररित्या गुणतक्ते वरील गुणतक्त्या सोबत पाठविण्यात यावेत.

| | माध्यमिक शाळा क्रमांक | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | विषयाचे नाव | विषय सांकेतीक क्रमांक | बैठक क्रमांक | मिळालेले गुण |

१) वरील प्रमाणे गुणतक्ते भरण्याची कार्यवाही करावी.
२) श्रेणी,तोंडी,पूर्व व्यावसायिक परीक्षा,अंध व अपंगासाठी कार्यानुभव,तंत्र व पूर्व व्यवसायिक प्रात्यक्षिक परीक्षा गुणतक्ते साहित्याचे वाटपावेळी करण्यात येईल तसेच सदरचे तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य परीक्षा झाल्यानंतर शाळांनी वितरण केंद्रावर दिनांक ०२/० ३/२०१९ रोजी न चुकता जमा करावयाचे आहे.
३) आऊट ऑफ टर्न ने झालेल्या परीक्षेचे साहित्य संबधित शाळांनी दिनांक २६/ ०३/२०१९ रोजी मंडळात चलनासह हस्तपोच जमा करावे.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर